प्रशांत खुंटे

# मीच मला व्याले

लेखक परिवर्तनाचा वाटसरूचे सहव्यवस्थापक आहेत.
ईमेल prkhunte@gmail.com

'माझी आई आणि भाऊ जे काम करतात ते मी कधीच करणार नाही. हे काय काम आहे? साऱ्या दुनियेने हागून-मुतून केलेली घाण मी या जन्मात तरी साफ करणार नाही.' हा निश्चय वैशाली वाल्मीकी या मुलीने बालपणी अनेकदा केला होता. एरवी असा निश्चय करण्याची वेळ कुणावर का येईल? पण वैशालीची आई सफाई कामगार होती. दोघे भाऊदेखील हेच काम करत होते. वैशालीला मात्र शिकण्याची आवड होती. पण लग्न झालं, दोन अपत्यं झाली नि तिच्या लक्षात आलं, की आपल्या लेकरांचं नशीब घडवायचं असेल तर आपल्यालाही बापजाद्यांचं काम करावंच लागेल. आपल्या आईप्रमाणेच मग तिनेही हातात बादली-खराटा घेतला आणि 'चकाचक पुणे' हे खोटं बिरूद मिरवणाऱ्या रौरवाच्या दुनियेत वयाच्या गद्धेपंचविशीत तिचा प्रवेश झाला.

'हगायला सगळ्यांना येतं; पण गू-घाणीचा वास आला की हीच माणसं असा चेहरा करतात की जणू हे त्यांच्या शरीरातून बाहेर आलेलंच नाही! जणू ही घाण फक्त त्या सफाई कामगारांचीच!' वैशाली तिटकाऱ्याने सांगते. समाजाचा हा शहाजोगपणा वैशालीने अगदी बालपणापासून पाहिला आहे. शाळेतल्या मैत्रिणी तिला जातीवरून चिडवायच्या तेव्हा धरणी दुभंगून आपण जमिनीत गुडूप झालो तर बरं, असं तिला वाटायचं; पण त्याच वेळी ती आपल्या आईकडे पाहून 'मेहतर' या शब्दाचा अर्थ लावायचा ती प्रयत्न करायची. आई पहाटेच उठते. तिला

जरासा उशीर झाला तर मुकादम लगेच खाडा नोंदवतो. एक दिवसाचा पगार वाचवायलाही आई किती आटापिटा करते! कधी पायी तर कधी दोन बस बदलून ती कामाला जाते. आईला लोक 'टिकरी कामगार' म्हणतात. टिकरीचं काम म्हणजे लोकांनी उघड्यावर केलेली विष्ठा घमेल्यात टाकणं. दुसऱ्याने हागलेलं खराट्याने साफ करणं. आईने हे काम नाही केलं तर तिला पगार मिळणार नाही, तिने आपल्यासाठी घेतलेलं कर्जही कधीच फिटणार नाही, हे वैशालीला कळे. मग आईचं काम चांगलं की वाईट, असा प्रश्न तिला पडे. अर्थातच शाळा शिकणाऱ्या वैशालीला तेव्हा या प्रश्नाचं उत्तर सापडणं शक्य नव्हतं. पण तरीही आईबद्दल या मुलीच्या मनात प्रेमच उफाळून येत होतं. कारण आईचं कर्तृत्व ती अनुभवत होती.

वैशाली व तिच्या दोन भावांना वडिलांचं प्रेम कधीच मिळालं नाही. वैशालीचे वडील एसएससी बोर्डात नोकरीला होते. त्यांनी दोन लग्नं केली होती. आधी त्यांनी एका परजातीतल्या स्त्रीशी विवाह केला. जातीतल्या बुजुर्गांनी या विवाहाला मान्यता दिली खरी, पण जातीतल्या मुलीशीही विवाह लावून दिला. तीच वैशालीची आई. पहिल्या लग्नातून त्यांना अपत्यं होतीच, शिवाय दुसऱ्या लग्नातूनही त्यांना तीन मुलं झाली. दोन मुलगे नि एक मुलगी. वडील पहिल्या पत्नीसोबत राहत. वैशालीच्या कुटुंबाकडे त्यांनी पाठच फिरवली होती. वैशाली सांगते, 'भवानी पेठेत आमच्या मामाचं घर होतं. घर म्हणजे एक खोली. या खोलीतच आम्हीही राहायचो. दोन माणसं आडवी झाली की त्या खोलीतली सगळी जागा संपायची. आई नि मी अर्धं शरीर पत्र्याखाली नि पाय घराबाहेर असे झोपायचो. भाऊ आमच्या उशाला झोपलेले असत.' नवऱ्याच्या सोबतीशिवाय मुलांना वाढवावं लागेल हे लक्षात आल्यानंतर आपल्या चिल्यापिल्यांसाठी वैशालीच्या आईने बदली कामगार म्हणून काम सुरू केलं. बदली कामगार म्हणजे एखादा सफाई कर्मचारी गैरहजर असेल तर त्या दिवसाचं काम बदली कामगारांना रोजंदारीवर मिळतं. हे काम मजूर अड्ड्यावरील कामगारांसारखंच बेभरवशी. फरक इतकाच, की मजूर अड्ड्यावरील कामगारांना गवंड्यांच्या हाताखाली काम मिळालं नाही तर सुताराच्या किंवा प्लंबरच्या हाताखाली तरी मिळतंच. इकडे मेहतर कामात बदली कामगार मात्र मेहतरच नेमले जात असत.

सफाई कामगारांमध्ये रस्ते झाडणारे व संडास साफ करणारे असे दोन प्रकारचे कामगार असतात. रस्ते झाडणाऱ्यांमध्ये नवबौद्ध व मातंग समाज अधिक आढळतो, तर संडाससफाईच्या कामात केवळ मेहतर-वाल्मीकी समाज असतो. वैशाली सांगते, 'महानगरपालिकेत संडाससफाई कामासाठीच्या हुद्द्याचं नावच 'मेहतर सेवक' असं आहे. इतर जातींमधील लोक हे काम अजिबात करत नाहीत. त्यामुळे माझ्या आईने ठरवलं असतं तरी तिला रस्ते झाडायचं काम मिळालं नसतं. तिच्या जातीसाठी शंभर टक्के आरक्षण म्हणून राखून ठेवलेलं काम आईला मिळालं! काही वर्षं बदली कामगार म्हणून काम केल्यानंतर तिला कायम केलं गेलं. ती आता पगारी मेहतर सेवक झाली.' मेहतर कामातील हे शंभर टक्के आरक्षण उत्तर प्रदेशमध्ये मायावती यांच्या सरकारने बंद केलं. त्यामुळे आता तिथे सफाई कामगारांची भरती करताना इतर जातींच्या उच्चजातीय उमेदवारांना प्राधान्य दिलं जातं. पण या धोरणाचा परिणाम मात्र उलटा झाल्याचं समजतं. तिथे सफाई कामगारांच्या नोकऱ्या सवर्णांनी पटकावल्या, पण सरंजामी जोर लावून कामं मात्र मेहतरांकडूनच करून घेतली जाऊ लागली. असो.

संडाससफाईचं काम घाणीतलं असल्याने ते करणाऱ्यांना साहजिकच संसर्गजन्य आजार वारंवार

होतात. त्यामुळे वैशालीच्या आईलाही आजारपणांमुळे खाडे करावे लागत. सफाई कामगारांचं काम पहाटेच सुरू होतं. त्यात त्याकाळी या कामगारांना दिवसातून चार वेळा हजेरी द्यावी लागायची. सकाळी सात, दुपारी बारा, मग दोन वाजता व शेवटची हजेरी संध्याकाळी सहा वाजता होत असे. म्हणजे रोज बारा-तेरा तास या कामगारांना राबावं लागायचं. शहरांमध्ये स्वच्छता ही 'अत्यावश्यक सेवा' या श्रेणीत मानली जाते. आगीच्या बंबावरील कामगार हेदेखील अत्यावश्यक सेवा देणारे सेवक. फरक इतकाच की आपत्कालीन स्थिती रोज उद्भवत नसते. घाण मात्र नित्याचीच बाब. त्यामुळे सफाई कामगारांना अगदी राष्ट्रीय सणांनाही सुट्टी नसते. थकल्याने अथवा आजारपणाने खाडेही वरच्यावर होत असत; पण खाडा झाला की त्या दिवसाचा पगार बुडायचा. त्या काळात सफाई कामगारांना पगारही खूप कमी होते. त्यामुळे खाडे अजिबातच परवडणारे नव्हते. म्हणून मग वैशालीचा थोरला भाऊ आईच्या जागेवर बदली कामगार म्हणून जाऊ लागला. थोरल्याच्या पावलावर पाऊल ठेवत लवकरच दोन नंबरच्या भावानेही शाळा सोडली नि तोही बदली कामगार बनला. घरातले तिघे सफाई कामगार बनले.

भावंडांपैकी कुणी शिकलं असतं तर कदाचित या नरकातून त्यांची मुक्तता झाली असती; पण या मुलांनी शिक्षणाकडे लक्ष दिलं नाही. आईप्रमाणे आपल्यालाही सफाई कामगाराची कायम नोकरी हमखास मिळेल याची त्यांना खात्रीच होती. कारण समाजात हे काम करायला इतर कुणीच तयार होत नाही. महाराष्ट्रात प्रामुख्याने भंगी, मेहतर, ओलगाना, रूखी, मलकाना, हलालखोर, लालबेगी, वाल्मीकी, कोरार, झाडमल्ली व हेला या अनुसूचित जातींमधील लोक मैलासफाईचं काम करतात. या जातींमधील मंडळी अनेक पिढ्यांपासून महाराष्ट्रात वास्तव्याला आहेत. दिल्ली, हरियाना, उत्तर प्रदेश, बिहार, गुजरात अशा विविध प्रांतांमधून ही मंडळी इकडे आली. पूर्वी राजेमहाराजांच्या स्त्रिया पडद्यात असत. त्यांचे पायखाने साफ करण्यासाठी काही जातींना खास नगरांमध्ये आणलं गेलं. खेड्यांमध्ये भूमिहीन वेठबिगारांचं जीवन जगणाऱ्यांनी राजाश्रयाच्या लोभाने मैलासफाईचं काम स्वीकारलं नि मग ते त्यांना कायमचं चिकटलं. पुढे नगरपालिका, महानगरपालिका विकसित झाल्या. शेकडो वर्षं उलटली, पिढ्या बदलल्या; पण आजही मैलासफाईचं काम ठराविक जातीतील लोकांनाच करावं लागत आहे. या शंभर टक्के आरक्षणाचा 'लाभ' वैशालीच्या भावांनाही मिळाला.

पुढे वैशालीच्या दोन्ही भावांना महानगरपालिकेत पर्मनंट नोकरी मिळाली. पण वाईट गोष्ट म्हणजे या दोघांनीही घाणीतलं हे काम करताना मन मरून जावं यासाठी दारूचा आधार घेतला. थोरल्या भावाचं लग्न झालं, नोकरीतील 'पर्मनंट' कामगारांच्या सुविधा त्याला फारच कमी काळ उपभोगता आल्या नि लवकरच दारूने घात केला. वैशाली सांगते, 'माझा हा भाऊ खूप सुंदर गायचा; पण त्याच्या गाण्यापेक्षा त्याचं घाणेरडं कामच लोकांना दिसलं. त्याची कला कोणाला कळलीच नाही. असं घाणेरडं जिणं जिण्यापेक्षा त्याने दारूत स्वत:ला बुडवून टाकलं...' दारूमुळे जडलेल्या आजारात त्याचं निधन झालं. वैशालीचा दोन नंबरचा भाऊ अजूनही नोकरीत आहे, पण तोही दारूच्या व्यसनात अडकलाय. त्यामुळे तोही कामाला जात नाही. त्याची पत्नीच घर चालवते.

'यशदा' या शासकीय संस्थेने मेहतर-वाल्मीकी समाजाबद्दल एक अभ्यास प्रकाशित केलाय. या अभ्यासातील निष्कर्षांनुसार सफाई करणाऱ्या समुदायातील २१ ते ४० या वयोगटातील स्त्री-पुरुषांमध्ये २५ टक्के मृत्यू व्यसनाधीनतेमुळे होतात. या समुदायातील व्यक्तींचं काम नि व्यसनाधीनता यांचा अन्योन्य संबंध आहे, पण कुठलीही

महानगरपालिका या कामगारांसाठी व्यसनमुक्ती कार्यक्रम राबवत नाही.

भावंडांचं नोकरी लागणं, व्यसनांच्या आहारी जाणं या काळात वैशाली मात्र मन लावून शाळा शिकत होती. वस्तीत शिकायला पोषक असं वातावरण अजिबात नव्हतं. 'तू शीक' असं सांगणारंही कुणी नव्हतं. पण या मुलीला शिकायची गोडी असल्याने ती दहावीपर्यंत आली. 'दहावीचं वर्ष म्हणजे ट्युशन हवीच'. पण वैशालीला खासगी ट्युशनची फी परवडणं शक्यच नव्हतं. तिने निमूटपणे आपला आपण अभ्यास केला. दहावीचा रिझल्ट लागला तेव्हा ही मुलगी गणिताशिवाय सर्व विषयांत पास झाली. कोणाच्याही प्रोत्साहनाशिवाय, कसल्याही सुविधेविना.

मेहतर समाजातील मुलं शिक्षणात अजूनही खूप मागे आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च इन्स्टिट्यूट (बार्टी) या शासनपुरस्कृत संस्थेने २०१५ सालात पुणे शहरातील सफाई कामगारांचा अभ्यास केला आहे. या अभ्यासानुसार सफाई कामगारांच्या कुटुंबांतील ६४ टक्के विद्यार्थी माध्यमिक शाळेत प्रवेश करण्यापूर्वीच शाळा सोडतात. त्यांच्या मते याचं मुख्य कारण आहे कमी वयात होणारी लग्नं. शिक्षणाचा ओढा नसणं, हेही एक महत्त्वाचं कारण आहेच. वैशालीला मात्र शिक्षणाची आवड होती. त्यामुळेच ती किमान दहावीपर्यंत तरी शिकू शकली.

मुलं शिकतात नोकरी मिळवण्यासाठी; पण मेहतर समाजाची नोकरी तर पिढ्यानपिढ्या ठरलेलीच आहे. जन्मजात नोकरीची अशी हमी मिळाल्याने मुलांचा ओढा कशासाठी शिक्षणाकडे असेल? मुलींच्या शिक्षणाची तर बातच सोडा. अर्थातच, वैशालीला दहावीनंतर शाळा सोडून घरीच बसावं लागलं. पण या मुलीला त्या काळात, कसं कुणास ठाऊक, शिक्षणाचं महत्त्व कळलं होतं. तिची शाळा सुटली, पण तिने आपल्या गरीब वस्तीतल्या मुलांसाठी ट्युशन सुरू केली. यातून घरखर्चाला हातभार लावावा हा हेतूही होताच. सुरुवातीला पहिली-दुसरीची मुलं-मुली शिकायला यायची. नंतर नंतर वस्तीतल्या पालकांचा विश्वास या मुलीने कमावला. त्यामुळे आठवी-नववीची मुलं-मुलीही शिकवणीला येऊ लागली. पाहता पाहता चाळीसहून जास्त विद्यार्थी, म्हणजे एखाद्या शाळेतला एक वर्गच या मुलीच्या खोपटात भरू लागला. मामाचं छोटंसं घर अपुरं पडू लागलं होतं. वस्तीत एक मारवाडी गृहस्थ होते. चिवड्याचं दुकान चालवणारे मोहन देवडा नावाचे हे गृहस्थ आपल्या दोन मुलांना वैशालीकडे ट्युशनसाठी पाठवत. त्यांनी वैशालीला आपल्या खोलीत ट्युशन चालवायची परवानगी दिली.

दरम्यान, पुणे महानगरपालिकेची गरीब वस्तीतील मुला-मुलींसाठी नागर वस्ती विकास योजना सुरू झाली. या योजनेअंतर्गत झोपडपट्टीतील मुलांच्या कलागुण विकासासाठी बालवर्ग चालवले जायचे. हे वर्ग चालवण्यासाठी वस्तीतल्या तरुणांना प्रोत्साहन दिलं जात असे. या कामाचा मोबदला म्हणून थोडेसे पैसेही मिळत. वैशालीने भवानी पेठेत असे बालवर्ग घ्यायला सुरुवात केली. वैशालीची शिकवण्याची हातोटी इतकी छान होती, की नागर वस्ती विकास योजनेअंतर्गत १९९६-९७ चा 'आदर्श संघटक' हा पुरस्कार तिने पटकावला. आपल्याला कधीही संडाससफाईचं काम करावं लागणार नाही, असा विश्वास त्यामुळे तिला वाटू लागला; पण तसं घडणार नव्हतं.

वैशालीला स्थळं येऊ लागली. मेहतर समाजातील चालीरीतींच्या मानाने तसं जरासं उशिराच म्हणजे वयाच्या विसाव्या वर्षी तिचं लग्न झालं. वैशाली वाल्मीकीची ती वैशाली बारये झाली. लग्नानंतर ती सासरच्या घरी चिपळूणला गेली. चिपळूणमध्ये एका टोकाला मेहतरांची वस्ती होती. चिपळूणमध्ये त्या काळात ड्रेनेज सुविधा नव्हती. त्यामुळे लोकांकडे टाकीचे संडास होते.

संडासच्या टाक्या गच्च भरल्यानंतर मेहतर वस्तीवर सांगावा यायचा. मग वस्तीतले दोघं-चौघंजण टाकी साफ करायचं काम उक्तं घ्यायचे. टाकीतली घाण टाकायला बाजूला एक खड्डा खणावा लागायचा. खड्डा खणणारे कामगार वेगळे नि टाकीतून मैला काढणारे वेगळे. मैला काढायला टाकीत उतरावं लागायचं. घमेल्यात खोऱ्याने मैला भरायचा नि वरच्या कामगाराच्या हातात पाटी सोपवायची, असं काम. हे काम करताना सारं शरीर मैल्याने माखून जायचं. वैशालीचा नवरा हे काम करत असे. हे काम करण्याशिवाय त्याला गत्यंतरही नव्हतं. कारण या समाजाला चिपळूणमध्ये अन्य व्यवसायाची संधीच नव्हती.

वैशालीच्या सासरेबुवांना वीज खात्यात सफाई कामगाराची नोकरी होती. ते निवृत्त झाल्यावर नवऱ्याला ही नोकरी मिळेल, अशी आशा होती. पण वीज खात्यात खासगीकरण आलं नि वीज महामंडळातलं सफाई कामगाराचं पदही कंत्राटी झालं. नवऱ्याला नोकरी मिळण्याची आशा अंधुक झाल्यानंतर संडासच्या टाक्या साफ करण्याचं काम करण्याशिवाय पर्याय उरला नाही. पण त्यातून किती पैसे मिळणार? आणि कसं भागणार? वैशाली सांगते, 'त्यामुळे आमची परिस्थिती खूपच खालावली. त्यात मला लग्नानंतर लवकरच दोन अपत्यं झाली. मला या चिमण्यांची खूप काळजी वाटायची. या पोरांना चांगलं शिक्षण मिळेल का याची चिंता लागून राहायची.'

चिपळूणमधील मेहतर समाजाची वस्ती हे एक भीषण जग होतं. वस्तीच्या आसपास डुकरांची लेंढारं चीत्कारत फिरत असायची. वस्तीत घरटी एक-दोघं दारूने झिंगलेले असायचे. अगदी बुजुर्ग महिलाही विड्या ओढायच्या नि दारू प्यायच्या. सुनांना घुंगट ओढूनच जगावं लागायचं. पुण्यात वाढलेल्या वैशालीसाठी हे जग एकदम परकं होतं. या जगात या मुलीचं स्वत्वच हरवू लागलं. वैशाली सांगते, 'एक दिवस घरात घासलेट नव्हतं. दुकानातून आणायला माझ्याकडे पैसेही नव्हते. मी शेजारच्या भाभीला माझी चिंता सांगितली. ती भाभी म्हणाली, 'चल, खाणपर चलते हैं...' खाण म्हणजे गावाचा उकिरडा. दोघी गेल्या. वैशालीने त्या भाभीच्या मदतीने उकिरड्यावरून आंब्याचे बाठे, नारळाच्या करवंट्या धुंडाळून आणल्या. मग हा शिरस्ताच झाला. असं सरपण गोळा करून आणायचं, उन्हात वाळवायचं नि चुलीत जाळून स्वयंपाक करायचा. सरपण धुंडाळताना भंगारात विकण्यासारखं काही मिळालं तर तेही जमवायचं. भंगार विकून तेवढाच संसाराला आधार व्हायचा.

असा संसार चालू असतानाच सासू-सासऱ्यांचं थोड्या थोड्या अवधीने निधन झालं. मग मात्र तिने पुण्यात जायचं ठरवलं. तिची आईही आता थकली होती. तिने स्वेच्छानिवृत्ती घ्यावी नि वैशालीने तिच्या जागेवर नोकरी करावी, असा विचार पुढे आला. खरंतर तिची इच्छा नव्हती. पण दुसरा पर्यायही दिसत नव्हता. वैशाली पती व मुलांसह पुण्यात आली. आईने स्वेच्छानिवृत्ती घेतली तरी लगेच वैशालीला नोकरी मिळाली नाही. तिला आधी आईचं काम शिकून घ्यावं लागलं. घाणेरड्या कामासाठीही स्वत:ला 'सिद्ध' करावं लागलं. आईने तिला संडास-मुताऱ्या दाखवल्या. झोपडपट्टीतले हे संडास इतके अस्वच्छ होते की पाहताच ओकारी व्हावी. संडासांमध्ये पाण्याची टाकी असे, पण महानगरपालिकेचा पाणीपुरवठा बेभरवशी. त्यामुळे तिथे घाणीचं साम्राज्य असे. शिवाय लोकांच्या नाना सवयी. अगदी घाणेरड्या. अनेकदा संडास साफ करायला पुरेसं पाणीही मिळत नसे. लोक संडासला छोट्याशा प्लास्टिक बाटलीत पाणी घेऊन येत आणि काम आटोपल्यावर ती रिकामी बाटली तिथेच टाकून निघून जात. एखाद्याला अंडरवेअरमध्ये जुलाब झाल्यास ती बरबटलेली चड्डी संडासात टाकून तो निघून जाई. सिगारेट ओढणारे सिगारेटची

पाकिटं संडासातच टाकत. दारूडे दारूच्या रिकाम्या बाटलीत लघवी करून ती बाटली संडासच्या खिडकीत ठेवून देत. विटा-दगडांचे तुकडे, कंडोमची पाकिटं, जांघांतून भादरलेले केस, ब्लेड्स, सॅनिटरी पॅड्स, चिंध्या, चेंडू असं काहीही संडासात टाकलेलं असायचं. त्यामुळे संडास वरच्यावर चोकअप व्हायचे. असं झालं तर अनेकदा संडासच्या भांड्यात हात घालून कचरा काढावा लागायचा. मुताऱ्यांच्या भिंतींवर गुटख्याच्या थुंकीची पुटं चढलेली असायची. ही घाण हातात काथ्या घेऊन घासल्याशिवाय निघणं शक्यच नसे. या घाणीत काम करताना वैशालीला अनेकदा ओकारी आली, कित्येकदा शिसारी आली; पण पर्याय कुठे होता? हळूहळू सर्व काही अंगवळणी पडलं, पण लोकांच्या वागण्याचा असह्य त्रास मात्र या मुलीला सहन करावा लागत होता.

वैशाली झोपडपट्टीत सफाईकाम करत होती. या वस्तीतले बहुतांश लोकही तिच्यासारखेच मागासवर्गीय. पण त्यांच्या देवांनाही वैशालीची सावली चालत नसे. वैशाली तो अनुभव सांगते. 'एकदा मी संडास धुवायला बादलीभर पाणी मागायला एका घराजवळ गेले. त्या घरात देव्हारा होता. मला पाहताच ती बाई धावून आली आणि मला हाकलत म्हणाली, 'ए पोरी, दूर हो. तुझी सावली माझ्या देवावर पडेल...' मी अपमानाचे घोट गिळले नि तिथून निघून आले.'

सफाई कामगार हा आपल्याला माणूसच वाटत नाही. अनेकदा बाई संडास धूत असते, पण त्याच वेळी पुरुष तिथे येऊन बाईसमोरच लघवी करू लागतात. काही लोक बुभुक्षित असतात. वैशाली पहाटेच्या अंधारात संडास धुवायला जात असे, त्या वेळी एकजण कित्येक दिवस तिची वाट पाहत अंधारात उभा असे. पहाटे कमी लोक संडासला यायचे. त्या संधीचा लाभ घेऊन हा माणूस अंधारात पँट खोलून पुटपुटायचा, 'येतीस का?' एवढ्या पहाटे तक्रार तरी कुणाकडे करणार? ही मुलगी घाबरून जायची. एकदा एकाने कहरच केला. संडासात बसलेल्याने लवकर बाहेर यावं यासाठी वैशालीने दार ठोठावलं. त्याचा राग येऊन त्या माणसाने संडासचं डबडंच वैशालीच्या डोक्यात मारलं नि तो पळून गेला. असे अनेक अपमान वैशालीने सहन केले. मग तीही निर्ढावली. मुतारी धुताना आत येणारे हटकून तिला स्पर्श करायचे. मग ही शिव्यांचा सपाटा सुरू करायची. हळूहळू या मुलीचं मनही मेलं. पहाटेच कामावर आलेल्या वैशालीच्या पोटात फक्त चहाचं पाणी असायचं. सर्व संडास साफ करेपर्यंत दहा-अकरा वाजायचे. सोबत जेवणाचा डबा आणलेला असायचा. पण जेवणार कुठे? वैशाली सांगते, 'मला रस्त्यात पाहिलं तरी लोक अंग चोरून बाजूला व्हायचे. म्हणून कुणाच्या दारात जाण्यापेक्षा मी संडासच्या ओट्यावरच जेवायला बसायचे.'

अशा रीतीने वैशालीच्या सगळ्या आशा गू-घाणीच्या दुनियेत लुप्त होऊन गेल्या. आठवड्यातले सातही दिवस तुंबलेल्या संडासांची दुर्गंधी सोसून ती जगू लागली. संडासात वळवळणाऱ्या किड्यांना लोटत किडामुंगीचं जीवन ती जगू लागली. ती सांगते, 'कधी आपल्या अंगावर बरा कपडा दिसला तर लोक हसतात. 'बघा, कशी शायनिंग मारते!' म्हणतात. घाण काम करतो म्हणून आम्ही चार माणसांसारखं धड नीटनेटकं दिसूही नये? असे प्रश्न वैशालीला पुसटसे जाणवत होते पण त्यांना शब्द मात्र मिळत नव्हते. अशात 'श्रमिक कामगार युनियन'कडून सफाई कामगारांसाठी संगणक प्रशिक्षण वर्ग घेतले जाणार आहेत, अशी माहिती वैशालीपर्यंत पोहोचली. जणू अंतराळातील दूरच्या ग्रहावरून मानवी अस्तित्वाचा पुरावा देणारा संदेशच तिच्यापर्यंत पोहोचला!

शैक्षणिक कार्यात महत्त्वाचं काम करणाऱ्या 'प्रथम' या स्वयंसेवी संस्थेमार्फत कामगारांना हे

प्रशिक्षण दिलं जाणार होतं. या प्रशिक्षणाच्या पहिल्या बॅचसाठी केवळ नऊ कामगारांनी नावं नोंदवली. दोन पुरुष व सात महिला सफाई कामगार. या अल्प प्रतिसादाचं कारण उघड होतं. ज्यांचं आयुष्य खराटा-बादलीशी बांधलंय त्यांचा संगणकाशी संबंधच असा किती येणार? पण या सरधोपट विचाराला अपवाद ठरणाऱ्यांपैकी वैशाली एक होती. काही तरी नवं शिकायला मिळेल या आशेने ती या प्रशिक्षण वर्गात हजर झाली. या वर्गाच्या निमित्ताने तिने पहिल्यांदा युनियनच्या कार्यालयात पाऊल ठेवलं. संघटनेच्या कॉ. मुक्ता मनोहर यांना तिने पहिल्यांदाच पाहिलं. वर्ग सुरू झाला. ओळखसत्र झालं. मुक्ता मनोहर यांनी वैशालीला विचारलं, 'तुझं शिक्षण किती?' वैशालीने उत्तर दिलं 'नववी.' त्यावर मुक्ताताई ताडकन इतरांना उद्देशून म्हणाल्या, 'ही मुलगी शिकलीय. हिने का म्हणून घाणीत काम करायचं? माणसाचा सन्मान या युगात केला जाणार नसेल तर कधी करणार?' हे वाक्य वैशालीच्या मनाला भिडलं. पहिल्यांदाच कुणी तरी तिला माणूस मानत होतं. तिला कुणी तरी असं भेटलं होतं ज्याला तिची नरकातून सुटका व्हायला हवी असं वाटत होतं. या प्रसंगानंतर भारावलेल्या वैशालीने संगणकाचा बेसिक अभ्यासक्रम पूर्ण केला; पण कोर्स संपल्यानंतरही ती युनियनच्या कार्यालयात येत राहिली. आता ती नवनवे विचार समजावून घेऊ लागली. कधी जाणवलेच नव्हते असे प्रश्न तिला आता स्पष्ट दिसू लागले.

'यशदा'च्या सर्वेक्षणानुसार सफाई कामगारांपैकी केवळ साडेसहा टक्के कामगार हातमोजे वापरतात, ११ टक्के कामगार गमबूट नि फक्त १४ टक्के कामगार वैयक्तिक स्वच्छतेसाठी साबणाचा वापर करतात. असं का असावं? सफाई कामगार वैयक्तिक सुरक्षा व स्वच्छतेप्रति इतके हलगर्जी का असतात? या प्रश्नाचं उत्तर २००९ मध्ये 'वॉटर एड इंडिया'ने प्रकाशित केलेल्या अभ्यास अहवालातून मिळतं. या अभ्यासानुसार शासकीय यंत्रणेकडून ९० टक्के सफाई कामगारांना हातमोजे, गमबूट, मास्क अशी कुठलीही सुरक्षा साधनं पुरवलीच जात नाहीत. दुसरीकडे टाटा समाजविज्ञान संस्थेने केलेल्या अभ्यासानुसार कामगारांना दिलेल्या सुरक्षा साधनांचा दर्जा अत्यंत निकृष्ट असतो असं निष्पन्न झालं आहे. याचा परिणाम काय होत असावा? परिणाम आहे सफाई कामगारांमधील भीषण मृत्युदर. पुणे महानगरपालिकेतील सफाई कामगारांसाठी आयुर्विमा महामंडळामार्फत एक 'गट विमा योजना' राबवली जात होती; पण कामगारांमध्ये मृत्यूचं प्रमाण इतकं होतं की महामंडळाने ही योजनाच गुंडाळली. 'नॅशनल दस्तक ब्युरो' या वेब न्यूज पोर्टलवर १० मार्च २०१६ रोजी प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार २०१५ या वर्षात भारतात २३,३२० सफाई कामगार सिवर लाइनमध्ये विषारी गॅसने गुदमरून मेले.

या सर्व भीषण परिस्थितीची जाणीव वैशालीला आता तीव्रतेने झाली आहे. त्यामुळे या नववी पास मुलीने कसून अभ्यास सुरू केला आहे. त्या अभ्यासातून समजलेला अर्क ती असा मांडते– 'सफाई कामगारांना सुरक्षेची सर्व साधनं मिळावीत अशी शिफारस १९७५ मध्ये लाड समितीने केली होती. त्यानंतर २००६ मध्ये कायद्यानेही ही गोष्ट बंधनकारक झाली. १९९३मध्ये आधीच्या कायद्यात बदल करून पुन्हा नवा कायदा आला. त्यातही याच शिफारशी होत्या. पण कुठलीच शासकीय यंत्रणा कायदा मानायला तयार नाही. आता २०१३मध्ये आधीच्या कायद्यातील सर्व त्रुटी घालवून सफाई कामगारांच्या पुनर्वसनासाठी नव्या तरतुदी झाल्या आहेत; पण कायदा कागदावर आहे आणि आम्ही कामगार अजूनही गटारातच आहोत...'

पुणे महानगरपालिकेच्या कामगार युनियनने सफाई कामगारांची अवस्था व समाजाचा त्यांच्याप्रति

असणारा निष्काळजी दृष्टिकोन चित्रित करणारा 'कचराकोंडी' हा माहितीपट निर्माण केला आहे. वैशाली म्हणते, 'हा माहितीपट पाहिल्यानंतर मी स्वत:कडे नव्या दृष्टीने पाहायला शिकले.' कामगार क्षेत्राचं हे एक वैशिष्ट्य आहे. कामगारांना आपण कोणत्या भीषण परिस्थितीत काम करतो याची अनेकदा जाणीवच नसते. त्यांना आपल्या सुरक्षेपेक्षा पगारवाढ, बोनस अशा मागण्यांमध्ये अधिक स्वारस्य असतं. त्यामुळे कामगार चळवळही अशाच मागण्यांमध्ये गुरफटून जाते. पुणे महानगरपालिकेच्या युनियनने मात्र बऱ्याच अंशी हा पायंडा मोडला आहे. या युनियनने कामगारांमधील माणूसपण जागवण्यासाठी माहितीपटाची निर्मिती केली. कामगारांमधील कलेला हेरून 'सत्यशोधक' हे अत्यंत यशस्वी नाटकही त्यांनी रंगमंचावर आणलं.

युनियनचे हे प्रयोग वैशालीला प्रभावित करून गेले. वैशाली म्हणते, 'युनियनचे प्रयोग कामगारांसाठी महत्त्वाचे आहेतच; पण तेवढ्याने भागणारं नाही. इतरही अनेक प्रश्न आहेत. अलीकडे महानगरपालिकेने कामगारांची भरतीच बंद केली आहे. नियमाप्रमाणे एका झाडू कामगाराने ४०,००० चौरस फूट (एक एकर) एरिया झाडायला हवा. त्यासाठी झाडू कामगारासोबत एक बिगारीही असायला हवा. पण महानगरपालिकेने बिगाऱ्यांची भरतीच बंद केलीय. आता झाडू कामगार झाडण्यासोबत कचरा भरायचंही काम करत आहेत.'

भारतात १९९१नंतर खुलं आर्थिक धोरण स्वीकारलं गेलं. आंतरराष्ट्रीय भांडवलाला भारतीय बाजारपेठा खुल्या झाल्या. पण बाजारातून माल घ्यायला या विकसनशील देशातील लोकांकडे पैसा हवा ना? म्हणून मग सरकारी नोकरदारांच्या पगारांमध्ये वाढ झाली. १९९४मध्ये पाचवा वेतन आयोग, नंतर २००६मध्ये सहावा व आता २०१६मध्ये सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात आल्या. परिणामी, शासकीय नोकरदारांच्या पगारात भरीव वाढ होत गेली. सफाई कामगार मोठ्या प्रमाणात शासकीय सेवेत असल्याने त्यांच्याही पगारात वाढ झालीच. अनेक सफाई कामगारांच्या घरात टी.व्ही., फ्रिज आले. काहींची मुलं इंग्रजी माध्यमात शिकायला जाऊ लागली. पण याचा अर्थ सफाई कामगारांचे प्रश्न संपले, असा होत नाही. वैशाली म्हणते, 'प्रश्न अधिक चिघळलेत. सरकारने आता कंत्राटीकरणाची कुऱ्हाड चालवायला सुरुवात केलीय. कंत्राटदारांना कामगारांचे श्रम हवेत, पण त्यांच्या जिवाची कोणाला पर्वा नाही...'

सहाव्या वेतन आयोगानुसार सफाई कामगारांचं दरमहा वेतन सरासरी १५ हजार रुपये होतं. सातव्या वेतन आयोगानुसार हे वेतन दरमहा २१ हजारच्या श्रेणीत जाणार आहे. पण या वेतनाचा लाभ खूपच थोड्या लोकांना मिळणार आहे. जगदीश खैरालिया यांनी २०१५-१६ या वर्षात नवी मुंबई व ठाणे परिसरातील सफाई कामगारांचा एक अभ्यास केला आहे. त्यात त्यांनी चारशे सफाई कामगारांच्या मुलाखती घेतल्या. त्यातून असं आढळलं की निम्म्याहून जास्त कामगारांचं उत्पन्न दरमहा ६ हजार रुपयांपेक्षा कमी आहे. याचं कारण आहे, शासकीय व खासगी क्षेत्रात वेगाने चालू असलेलं कंत्राटीकरण. वेतन आयोगांच्या शिफारशींनतर शासकीय नोकरदारांच्या पगारात वाढ झाली. पण असं म्हणतात, की त्यामुळे शासकीय नोकरदारांच्या पगाराचा बोजा सरकारला सहन होईनासा झाला आहे. परिणामी, सरकारने नोकरभरती थांबवली आहे. या धोरणाची निर्दयी कुऱ्हाड अर्थातच समाजातील सर्वांत दुर्बल कामगार घटकांवर चालवली जात आहे. परिणामी, सरकारी दवाखाने असोत वा महानगरपालिका, सफाईचं काम मोठ्या प्रमाणात कंत्राटदारांकडून करून घेतलं जात आहे. वैशाली म्हणते, 'कंत्राटी कामगारांच्या समस्या बिकट बनल्या आहेत. त्यांना महिनोनमहिने पगार

मिळत नाहीत. सुट्ट्या, बोनस, सुरक्षेची साधनं यांचा तर पत्ताच नाही. त्यामुळे आता आम्ही या कामगारांना संघटनेमध्ये सहभागी करून घेत आहोत. कंत्राटी कामगारांचा लढा आम्ही उभारणार आहोत.'

सफाई कामगारांना हक्काचं घर नसणं ही एक अत्यंत कळीची समस्या आहे. बहुसंख्य सफाई कामगार वर्षानुवर्षं झोपडपट्ट्यांमध्ये राहतात. बहुतेकदा दोन-तीन कुटुंबं झोपडपट्टीतील छोट्याशा खोलीत राहतात. महानगरपालिकेकडून ज्यांना क्वार्टर्स मिळाल्या आहेत ते लोक ही भाडेतत्त्वावरील जागा हातची जाऊ नये म्हणून सफाई कामगार म्हणून काम करणं पत्करतात. या चक्रामुळे हा समाज या कामातून मुक्तच होऊ शकत नाही. पुणे महानगरपालिका कामगार युनियन ही देशातील एकमेव अशी युनियन आहे, जिने कामगारांच्या या प्रश्नावर मार्ग काढण्यास महानगरपालिकेला भाग पाडलं आहे. ज्या सफाई कामगारांनी २५ वर्षं सेवा दिली आहे अशा कामगारांसाठी महानगरपालिकेच्या गृहप्रकल्पात राखीव घरकुल मिळण्याची तरतूद संघटनेने मंजूर करून घेतली आहे. अशा कामगारांना घरं मिळवून देणं, एखादा कामगार निवृत्त होणार असल्यास त्याच्या वारसांसाठी नोकरीचे प्रयत्न करणं, या कामांमध्ये आता वैशाली गढून गेली आहे.

पूर्वी चारचौघांत एक शब्दही बोलू न शकणारी वैशाली आता जुलमी मुकादमांच्या आणि मुजोर नागरिकांच्या दमदाटीविरोधात कामगारांच्या बाजूने उभी राहते. महिला सफाई कामगारांचे प्रश्न तिला खूप जिव्हाळ्याचे वाटतात. ती म्हणते, 'सफाई कामगार बाई पहाटे घर सोडते, कारण तिला आरोग्यकोठीत सकाळीच हजेरीला यावं लागतं; पण आरोग्यकोठीत बसायला साधं बाकडंही नसतं. स्वच्छतागृहाचीही सोय नसते. वर मुकादमांची अरेरावी. शिवाय नगरसेवकांच्या चमच्यांची दादागिरी निराळीच. कुणीही येतो नि सफाई कामगारांवर रुबाब झाडायला लागतो. स्वच्छता ही आपली जबाबदारी आहे असं आपला समाज मानतच नाही...' कुटुंबातूनही बाईला काहीच आधार मिळत नाही. तीच मुलांचं-नवऱ्याचं-सर्वांचं बघते. एवढं राबूनही 'बाई, तुझं डोकं दुखतंय का?' अशी साधी विचारपूसही घरातलं कुणी करत नाही.

उरुळी कचरा डंपिंग ग्राऊंड ही पुणे शहराची एक सदैव चिघळती जखम आहे. शहराच्या कचऱ्याची विल्हेवाट कशी व कुठे लावायची यातून ही समस्या थोड्या थोड्या काळाने डोकं वर काढत असते. २०१५मध्ये असंच झालं. उरुळीच्या नागरिकांनी आंदोलन सुरू केलं. त्यामुळे न्यायालयाने ओला व सुका कचरा वेगवेगळा करून त्याची विल्हेवाट लावायचे आदेश काढले. वैशालीच्या मते 'खरं तर कचरा टाकणाऱ्यांनी कचरा वेगवेगळा करून टाकावा, असे न्यायालयाचे आदेश होते; पण महानगरपालिकेने सगळा कचरा एकत्रच जमा केला आणि मग सफाई कामगारांना दोन आठवडे तो कुजलेला कचरा चिवडण्याचं काम सांगितलं. तो कचरा ओला आणि सुका असा वेगवेगळा करताना कामगारांचे अतोनात हाल झाले. कचऱ्यात गू-घाण तर होतीच, पण मेलेली जनावरं, कुजलेला कचरा... काय वाट्टेल ते होतं. पण हा कचरा वेगवेगळा केला नाही तर हजेरी लावणार नाही, अशी धमकी देऊन कामगारांकडून काम करून घेतलं गेलं. नंतर असं काम करून घेणाऱ्या महानगरपालिकेला कचरा वर्गीकरणाचं उत्कृष्ट काम केल्याबद्दल सरकारने गौरवलंदेखील. हे आहे सरकारच्या स्वच्छ भारत अभियानातलं सफाई कामगारांचं स्थान!'

वयाची तिशी ओलांडताना वैशालीच्या जीवनात युनियन आली त्यामुळे तिला तिचे हक्क समजले. 'माणसाने माणसाचा मैला साफ करणं हे अमानवी

**(पान ३२ वर पाहा)**

संगीतकार/ पार्श्वगायक लोकप्रिय होण्याचे कारण म्हणजे ऑल इंडिया रेडिओ, विविध भारती आणि रेडिओ सिलोन. पूर्णविराम! या संदर्भात म्युझिक उद्योगाचा उल्लेखदेखील त्यांनी केलेला नाही. माझ्या मते जुने फिल्म संगीत व गीतकार/संगीतकार/ पार्श्वगायक लोकप्रिय करण्यामध्ये रेकॉर्डिंग इंडस्ट्रीचा फार मोठा हातभार लागला आहे. रेडिओ आणि प्रमुखतः HMV या जुन्या म्युझिक कंपनीच्या ध्वनिमुद्रिका यांच्यामुळे फिल्म-संगीत व सर्व संबंधित कलाकार लोकप्रिय झाले एवढेच नाही, तर ते संगीत टिकवण्याचे कार्यही ऑल इंडिया रेडिओ आणि HMVमुळे पार पडले आहे.

(६) परफॉर्मर कोण? : आपल्या कायद्यातील परफॉमरची व्याख्या पुरेशी व्यापक आहे. त्यात गायकच नव्हे तर वादक, नट, नर्तक, डोंबारी, कसरत करणारा, जादूगार, हातचलाखीचे प्रयोग करणारा, गारुडी, वक्ता किंवा भाषण देणारा, किंवा कोणतेही सादरीकरण (परफॉर्मन्स) करणारा – या सगळ्यांचा समावेश होतो. आपापले सामायिक हितसंबंध जपण्यासाठी व त्यायोगे कला-वृद्धी करण्यासाठी वेगवेगळ्या क्षेत्रातील परफॉर्मर्सनी त्यांच्या संघटना स्थापन करण्याचा विचार केला पाहिजे. अशा संघटनांना आता कॉपीराईट कायद्याचे पाठबळ मिळू शकते. आम जनतेकरिता एखाद्या गायकाइतकाच एखादा जादूगारही महत्वाचा असतो – त्याची कलाही कलाच असते! त्यालाही आपली उन्नती साधायची असते. आजमितीस, माझ्या अपेक्षेप्रमाणे, वादक व नट-नट्यांच्या संघटना नजीकच्या काळात स्थापित होऊ शकतील. अर्थात, लेट अस वेट अँड वॉच! ●

---

(प्रशांत खुंटे, पान २३ वरून)

आहे. समाजाने कोंडी केली म्हणून मेहतर समाज या कामात गुंतला आहे. पण आता यापुढे आम्ही हे काम करणार नाही,' असं वैशाली ठामपणे सांगते. लहानपणीही तिची हीच भावना होती. पण आता त्या भावनेला मानवतेच्या शास्त्रकाट्याची कसोटी प्राप्त झाली आहे. अध्यात्मिक मुक्तीची भावना व्यक्त करणारा तुकारामांचा एक अभंग आहे – 'मीचि मज व्यालो, पोटा आपुलिया आलो...' वैशालीची भावना यापेक्षा काय वेगळी आहे? तिने सफाई कामगारांच्या मुक्तीची भाषा सुरू केली आहे. 'स्वच्छ भारता'चं स्वप्न साकारताना आपल्याला तिच्यासारख्या अनेकांची मुक्ती करावी लागणार आहे. ●

(अनुभव मासिकाच्या दिवाळी अंक २०१६ मधून साभार पुनर्मुद्रित.)

'परिवर्तनाचा वाटसरू'मध्ये प्रसिद्धीसाठी पाठवलेल्या लेखांचे स्वागत आहे.

संपादनाच्या सोयीसाठी प्रकाशनासाठी पाठवलेले लेख सुवाच्य हस्ताक्षरात लिहिलेलेले वा टंकलिखित वा संगणकाद्वारा मुद्रित केलेले असावेत. मुद्रित लेख युनिकोड अथवा श्रीलिपी ७ च्या श्री-देव७-०७०८ या फाँटमध्ये पाठवावा.

**वाटसरूचा नवीन पत्ता**

द्वारा **प्रशांत खुंटे**
वॉर्ड क्र. ५/ घ. क्र. ६२, बौद्धविहाराजवळ,
गणेशनगर, येरवडा, पुणे ४११००६
भ्र. ७७७६९०२२६७